**<u>ठळक बातम्या</u>**

- अतिवेगवान वंदे भारत स्लीपर रेल्वेगाडीची चाचणी यशस्वी
- 'परीक्षा पे चर्चा' या उपक्रमाने ओलांडला ऐतिहासिक टप्पा
- सीबीएसई च्या दहावी - बारावीच्या परीक्षांचं सुधारित वेळापत्रक जाहीर
- महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकांच्या नामांकन अर्जांची छाननी

**आणि**

- देशाच्या उत्तर भागात थंडीचा कडाका- दाट धुक्याचं राज्य

**<><><><><>**

स्वदेशी बनावटीच्या वंदे भारत स्लीपर ट्रेनची हायस्पीड चाचणी पूर्ण झाली असून ही ट्रेन सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कोटा-नागदा विभागात ही चाचणी घेण्यात आली असून यावेळी ट्रेन १८० किलोमीटर प्रति तास वेगानं धावली. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या चाचणीची चित्रफित समाजमाध्यमावर पोस्ट केली.

**<><><><><>**

ओएनडीसी अर्थात ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स या उपक्रमाने देशातल्या डिजिटल व्यापाराचं सार्वत्रिकीकरण करून देशाच्या ई-कॉमर्स क्षेत्रात बदल घडवून आणत असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. गेल्या चार वर्षात ओएनडीसीने मुक्त सहभाग आणि नावीन्यपूर्ण संकल्पना तसंच सहकार्याला चालना दिली आहे. या उपक्रमामुळे लहान दुकानदारांना डिजिटल बाजारपेठेत आणून डिजिटल परिसंस्थेवरचा विश्वास मजबूत केला, असं गोयल म्हणाले.

**<><><><><>**

गेल्या दशकभरात देशाच्या उपभोक्ता आधारित अर्थव्यवस्थेत उत्पादन, तंत्रज्ञानाच्या मदतीने संरचनात्मक परिवर्तन घडून आलं आहे. वाढती परकीय गुंतवणूक, विस्तारणारी औद्योगिक क्षमता आणि आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळ्यांमुळे सरत्या वर्षात भारत फक्त वेगाने वाढणारी बाजारपेठ म्हणूनच नाही तर जगासाठी एक उत्पादन केंद्र म्हणून उदयाला आला आहे. अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून....

**----------------व्हीसी-------------------**

*(२०२५ या वर्षात भारताने औद्योगिक युगाचा एका महत्त्वाचा टप्पा गाठला. यंदा अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी त्यांचे उत्पादन प्रकल्प भारतात हलवले. भारतातलं इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन ११ लाख ५० हजार कोटी रुपयांपर्यंत वाढलं तर निर्यात ३ लाख २६ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आणि भारत जागतिक स्तरावर दुसरा सर्वात मोठा मोबाईल फोन उत्पादक बनला. देशात विकले जाणारे ९९ टक्क्यांपेक्षा जास्त फोन आता मेड इन इंडिया आहेत. इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात १ लाख १५ हजार कोटी रुपयांचे गुंतवणूक प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यंदा सेमीकंडक्टर आणि प्रगत इलेक्ट्रॉनिक पायाभूत सुविधांमध्ये वाढ झाली. १० सेमीकंडक्टर युनिट्सना मंजुरी मिळाल्याने जवळपास १ लाख ६० हजार रुपयांची गुंतवणूक झाली. इलेक्ट्रॉनिक वाहन परिसंस्थेनेही यंदा महत्त्वाचा पल्ला गाठला. सौरउर्जाउत्पादन क्षेत्रात यंदा १०० गिगावॅट इतकं उत्पादन केलं. भारत संचार निगम लिमिटेडने स्वदेशी फोरजी स्टॅक आणल्यामुळे भारत दूरसंचार उपकरण उत्पादन क्षेत्रात एक महत्त्वाचा देश बनला. यंदा विमान वाहतूक उत्पादनालाही गती मिळाली. भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये यंदा अभूतपूर्व सुलभता, पारदर्शकता आणि विस्तारक्षमता आली. आघाडीच्या ऑटोमोटिव्ह, सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांनी संपूर्ण भारतात नवीन प्रकल्प, लॉजिस्टिक्स हब आणि संशोधन आणि विकास केंद्रांमध्ये अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक केली. )*

**<><><><><>**

नववर्षाच्या स्वागतासाठी देशात सर्वत्र, विशेषतः तरुणाईमध्ये उत्साह पहायला मिळत आहे. पर्यटन स्थळं पर्यटकांनी फुलून गेली आहेत. नवीन वर्षांचं

आगमन साजरं करण्यासाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन विविध शहरात पोलिसांनी आज चोख  बंदोबस्त ठेवला आहे. सीमावर्ती राज्यांमधे गेल्या काही दिवसांपासून तपासणी बंदोबस्त कटक करण्यात आला आहे. अनेक ठिकाणी ड्रोनच्या माध्यमातून गस्त घालण्यात येणार असून मद्यपी वाहनचालकांची तपासणी सुरू आहे. वाहतुकीच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे.

नववर्ष स्वागतासाठी मुंबईत उपाहार गृहं, क्लब्ज आणि मनोरंजन स्थळं रात्रभर चालू ठेवायला प्रशासनाने परवानगी दिली आहे. विविध मॉल्स, रस्ते आणि इमारतींवर सजावट करण्यात आली आहे. अनेक जण देवदर्शन करुन नव्या वर्षाचा प्रारंभ करीत असल्याने विविध देवालयं आणि धार्मिक स्थळांवरही सुविधा आणि सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या ‘परीक्षा पे चर्चा’ या उपक्रमाने ऐतिहासिक टप्पा ओलांडला आहे. ‘परीक्षा पे चर्चा’ या उपक्रमात सहभागी होण्यासाठी देशभरातून कालपर्यंत तीन कोटींहून अधिक जणांनी नोंदणी केली आहे. देशभरातले विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी यात सहभाग घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याला प्राधान्य देणं तसंच परीक्षांच्या अनुषंगाने त्यांचा सकारात्मक दृष्टीकोन विकसित करणं, हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षांचं सुधारित वेळापत्रक जाहीर केलं आहे. दहावीची परीक्षा पुढच्या वर्षी ११ मार्चपासून सुरू होईल. तर बारावीच्या परीक्षेची तारीख १० एप्रिल असेल. यापूर्वी या दोन्ही परीक्षा ३ मार्च रोजी होणार होत्या. प्रशासकीय कारणांमुळे वेळापत्रकात बदल करण्यात आल्याचं मंडळाने म्हटलं आहे. संलग्न असलेल्या सर्व शाळांनी ही

माहिती आपल्या विद्यार्थ्यांना आणि पालकांना द्यावी, अशा सूचना मंडळाने दिल्या आहेत.

<><><><>

युवा लेखकांच्या प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी सुरु केलेल्या प्रधानमंत्री युवा योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातल्या विजेत्यांची घोषणा काल करण्यात आली. इंग्रजीसह एकंदर २२ भारतीय भाषांमधल्या ४३ विजेत्यांचा यात समावेश आहे. मराठीसाठी दिव्यांशू सिंग, अंबादास मेव्हाणकर आणि प्रसाद जाधव या लेखकांचा विजेत्यांमध्ये समावेश आहे. सर्व विजेत्यांच्या संकल्पनांचं पुस्तकात रुपांतर करण्यासाठी या लेखकांना सहा महिन्यांचं मार्गदर्शन आणि दर महिन्याला ५० हजारांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. याशिवाय पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर आयुष्यभरासाठी १० टक्के मानधनही दिलं जाणार आहे.

<><><><>

महाराष्ट्रातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. या अर्जांच्या छाननीला सकाळी अकरा वाजता सुरूवात झाली. २ जानेवारीला दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. ३ जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप होईल, आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. येत्या १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे.

दरम्यान, मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी एकूण ११ हजार ३९२ उमेदवारी अर्ज वितरित करण्यात आले असून त्यापैकी २ हजार ५१६ अर्ज दाखल झाल्याचं राज्य निवडणूक आयोगानं सांगितलं.

काल अखेरच्या दिवसापर्यंतही अनेक ठिकाणी जागावाटपाचं चित्र स्पष्ट नव्हतं. सर्व राजकीय पक्ष स्थानिक समीकरणं पाहून युती आणि आघाडीचा निर्णय घेत आहेत. अनेक ठिकाणी विरोधी आघाड्यातल्या घटक पक्षांनी एकमेकांशी युती

केली तर काही ठिकाणी सर्व पक्षांनी स्वतंत्र लढण्याचं जाहीर केलं. अनेक उमेदवारांनी काल पक्षांतर करून उमेदवारी मिळवली. त्यामुळं राजकीय पक्ष आणि उमेदवारांसह मतदारांमध्ये संभ्रम होता.

मुंबई महानगरपालिकेसाठी भाजपा आणि शिवसेना युतीचं जागावाटपाचं सूत्र निश्चित झालं आहे, यानुसार भाजपा १३७ जागा लढणार असून शिवसेना ९० जागा लढवणार आहे. तर रिपब्लिकन पक्षाने स्वतंत्र ३९ जागांची घोषणा केली आहे. काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आणि रासप एकत्र निवडणूक लढवत आहेत. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या पक्षांनीही काल दिवसभर एबी फॉर्मचं वाटप केलं. मात्र त्यांचं जागावाटप स्पष्ट झालं नाही. दरम्यान, राजु शेट्टी यांच्या स्वाभिमानी पक्षाने महाविकास आघाडीच्या घटक पक्षांना पाठिंबा देण्याचं जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

भारत, चीन, व्हिएतनाम, फिलिपिन्स, इंडोनेशिया आणि कंबोडियामधल्या पर्यटकांना दक्षिण कोरियात येण्यासाठी मोफत व्हिसा सुविधेची मुदत सहा महिन्यांसाठी वाढवली आहे. सी -३-२ व्हिसासाठी पुढच्या वर्षी जूनपर्यंत मुदत वाढवल्याचं दक्षिण कोरियाचे अर्थमंत्री कू यून चेओल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

दोहा इथं सुरू असलेल्या जागतिक ब्लिट्झ चॅम्पियनशिप स्पर्धेत काल ग्रँडमास्टर अर्जुन एरिगेसीला कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं. उपांत्य फेरीत उझबेकचा अव्वल खेळाडू नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हने त्याला हरवलं. गतविजेता मॅग्नस कार्लसननं दुसऱ्या उपांत्य फेरीत अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाला ३-१ असं पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अर्जुन एरिगेसीचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

देशाच्या उत्तर भागात थंडीचा कडाका वाढला आहे. जम्मू- काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि हिमालयीन प्रदेशात हिमवृष्टी होत आहे. पश्चिमी वाऱ्यांच्या अभावामुळे राजधानी दिल्लीसह उत्तरेच्या राज्यांमधे तापमानात घट झाली असून धुक्याची दाट चादर पसरली आहे. दृष्यमानता कमी झाल्यामुळे रस्ते, रेल्वे आणि हवाई वाहतुकीवर परिणाम झाला आहे. दिल्ली विमानतळावरची १४८ उड्डाणं आज रद्द करण्यात आली. उत्तर प्रदेश,मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, हरियाणा, राजस्थान, छत्तीसगड ही राज्य थंडीने गारठली असून सर्वत्र धुक्याचं राज्य आहे. महाराष्ट्रातही किमान तापमानात घट झाली असून आज सकाळी राजधानी मुंबई आणि उपनगरातही दाट धुकं होतं.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं, जम्मू आणि काश्मीर, लडाख, गिलगिट-बाल्टिस्तान आणि मुझफ्फराबाद इथं आज जोरदार हिमवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे. उत्तरेकडच्या राज्यांमध्ये दाट धुक्याचा इशारा जारी करण्यात आला आहे. हिमाचल प्रदेश, कर्नाटकचा काही भाग आणि तेलंगणात आज थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. अंदमान आणि निकोबार बेटे, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल आणि पश्चिम राजस्थानमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस आणि जोरदार वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे.

**//<><><><><>//**